# दोनोड्याच्या माणिकराव कदम यांची तुरीची आदर्श शेती

२७ जानेवारी २०११ रोजी माणिकराव बाबाराव कदम मु. दोनोडा, ता. कळंब, जि. यवतमाळ यांचे शेतातील तुरीचे पिकाची पाहणी करण्यास गेलो होतो. त्यांच्या शेतात पाऊल टाकताच असे वाटले की, आकाशातून त्यांच्या शेतात सुवर्णाचा वर्षाव झालेला आहे. हिरव्यागार तुरीच्या झाडावर सोनेरी फुले उन्हात चमकत होती आणि क्षणात ते निसर्ग दृश्य पाहून मन प्रसन्न झाले. सामान्य शेतकरी तुरीचे सलग पीक घेत नाहीत. कापसाचे पिकात तुरीचे आंतरपीक घेतात. कदम यांनी ६ एकरात सलग (निव्वळ) तुरीचे विविध जातींचे पीक घेतले आहे. त्यामध्ये इक्रीसॅटच्या आयसीपीएच-२६७१ व आयसीपीएच २७४० या संकरीत जाती आणि अभय, आशा व मारोती या साध्या तुरीच्या जाती आहेत. याशिवाय डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची 'तारा', म. फुले कृषी विद्यापीठाची 'विपुला', कर्नाटकाची 'चिकोडी' आणि एका कंपनीची 'पंचगंगा' अशा तुरीच्या नऊ जाती सध्या त्यांचे शेतात उभ्या आहेत. त्यामुळे आपण उपाहारगृहात आपल्या आवडीच्या खाद्यपदार्थाची निवड करतो, त्याप्रमाणे आपणास आवडणारी सर्वाधिक तुरीचे उत्पादन देणारी जात आपणास निवडता येते. सध्या 'तारा' ही तुरीची जात कापणीस तयार झालेली आहे. या सर्व जातीच्या तुरीच्या झाडावर बुडापासून शेंड्यापर्यंत भरपूर शेंगा आहेत. ही झाडे पाहून कोणाही शेतकऱ्याचे मन प्रसन्न होऊन तो कदम यांना धन्यवाद देईल. मी गेल्या उन्हाळ्यात शेतकऱ्यांनी सोयाबीनचे पीक न घेता तुरीचे पीक घ्यावे, अशी शेतकऱ्यांना विनंती केली होती.

कदम यांनी माझा सल्ला शिरसावंद्य मानला आणि तो प्रत्यक्षात आपल्या शेतात उतरविला आहे. यावर्षी त्यांना निसर्गाने त्यांच्या श्रमाचे भरपूर फळ दिलेले आहे. यावर्षी डिसेंबर महिन्यातील कडक थंडीमुळे बहुतेक शेतकऱ्यांचे तुरीचे पीक करपले आहे, त्याचवेळी कदम यांनी त्यांचे तुरीचे पिकाला कालव्याचे पाणी दिले होते. त्यामुळे उन्हाने तापलेल्या जमिनीला पाणी मिळाल्याने तुरीचे पिकात उष्णता वाढली आणि कदम यांच्या तुरीचे पिकावर कडक थंडीचा मुळीच दुष्परिणाम झालेला दिसला नाही. त्यांच्या शेतातील तुरीच्या सर्व जातींचे मी बारकाईने निरीक्षण केले असता 'चिकोडी' जातीची झाडे सर्वोत्कृष्ट वाटली आहेत. या जातीचे झाडांचा विस्तार मोठा असून झाडावर बुडापासून शेंड्यापर्यंत प्रत्येक फांदीवर सहा दाण्यांच्या टपोऱ्या शेंगा दिसल्या. त्यामुळे या जातीचे सर्वाधिक उत्पादन मिळण्याचा अंदाज आहे. सर्व तुरीच्या झाडावर एकही शेंगा पोखरणारी अळी (घाटेअळी) सापडली नाही. मात्र काही शेंगातील एखादा दाणा शेंगमाशीच्या अळीने पोखरलेला आढळला. संपूर्ण तुरीचे पीक निरोगी (रोगरहित) हिरवेगार आढळले. कदम यांनी गेल्या वर्षी देखील सलग तुरीचे पीक घेतले होते आणि ४० टक्के पिकाचे उधईने नुकसान केले होते. त्यामुळे त्यांना दर एकरी सरासरी साडेआठ क्विंटल तुरीचे उत्पादन मिळाले होते. या वर्षी थिमेट व निंबोळी पेंड शेतात मिसल्याने उधईचा उपद्रव १० टक्के पिकाला झाला. यावर्षी दर एकरी १० क्विंटलपेक्षा अधिक सरासरी तुरीचे उत्पादन मिळण्याचा त्यांचा अंदाज आहे. त्यांचे या तुरीचे शेताला इक्रीसॅटचे शास्त्रज्ञ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ यांनी भेट देऊन त्यांनी कदम यांना शाब्बास्की दिलेली आहे. माझी विदर्भातील शेतकऱ्यांना आग्रहाची विनंती आहे की, त्यांनी कदम यांची आदर्श तुरीची शेती पाहून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे. ■

- डॉ. बा.ब. राहुडकर
रुईकर मार्ग, महाल
नागपूर-४४००३२